SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR– 416 004 MAHARASHTRA
Phone : EPABX-2609000 **Stat Cell**: 0231-2609147.
website : www.unishivaji.ac.in
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर– ४१६ ००४ – महाराष्ट्र
दूरध्वनी: (ईपीएबीएक्स)२६०९००० सांख्यिकी कक्ष :०२३१-२६०९१४७.
E-Mail : statcell@unishivaji.ac.in
Estd : 1962
NAAC 'A++' Grade

**जा.क्र./शिवाजी वि./सांख्यिकी कक्ष/एआयएसएचई/२०२४-२५/ 95** **दिनांक : 01/09/2025**

# स्मरणपत्र

**प्रति,**
**मा. प्राचार्य / संचालक,**
**सर्व संलग्नीत महाविद्यालये / मान्यता प्राप्त संस्था**
**शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.**

**विषय : अखिल भारतीय उच्च शिक्षण सर्वेक्षण कार्यक्रम सन २०२४-२५**
Web DCF मध्ये माहिती भरण्याबाबत...

**संदर्भ : १) जा.क्र./शिवाजी वि./सांख्यिकी कक्ष/एआयएसएचई/२०२४-२५/१२०, दि.२५/०७/२०२५ रोजीचे या कक्षाचे परिपत्रक.**
**२) मा. डॉ. शैलेंद्र देवळाणकर, शिक्षण संचालक (उच्च शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे क्रं. उशिसं/सांख्यिकी/एआयएसएचई/२०२४-२५/E-१९९३५६, दि.२३/०७/२०२५ रोजीचे पत्र.**

**महोदय / महोदया,**

उपरोक्त विषयास अनुसरून आपणास आदेशान्वये कळविण्यात येते की, मानव संसाधन विकास मंत्रालय, नवी दिल्ली यांनी अखिल भारतीय उच्च शिक्षण सर्वेक्षण कार्यक्रम २०२४-२५ वेबपोर्टलवर माहिती नोंद करण्याबाबत कळविलेले आहे. सदर वेबपोर्टलवर (www.aishe.gov.in) माहिती नोंद करण्याची सुरवात झालेली आहे. या अनुषंगाने विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयांनी आपली प्रशासकीय, शैक्षणिक, व शैक्षणिकेत्तर बाबींची सन २०२४-२५ करीता माहिती नोंद करावयाची आहे. **सदर माहिती दि. ३१/०८/२०२५ पर्यंत** वेबपोर्टलवर नोंदवावयाची आहे असे संदर्भ क्रं. १ नुसार या कक्षाकडून परिपत्रकाव्दारे कळविण्यात आले होते.

सदर परिपत्रकानुसार कार्यशाळा आयोजित करुन कार्यशाळेच्या दिनांकाबाबत आपणास कळविण्यात येईल अशी सूचना देण्यात आलेली होती. परंतू काही अपरिहार्य कारणास्तव सदर कार्यशाळा ऑगस्ट महिन्यात घेता आलेली नाही. **आता सदर कार्यशाळा दि.१६/०९/२०२५ रोजी विद्यापीठात आयोजित करण्यात आलेली** असून सदर कार्यशाळेचे परिपत्रक व रजिट्रेशन बाबतची गुगल फॉर्म लिंक आपल्या महाविद्यालयास यापूर्वी पाठविण्यात आलेली आहे. सदर लिंक वर नोडल अधिकारी यांनी रजिट्रेशन करुन कार्यशाळेस उपस्थित राहून वेबपोर्टलवर नव्याने बदल होणाऱ्या माहितीचा लाभ घ्यावा.

कार्यशाळा अद्याप न झाल्यामूळे नोडल अधिकारी यांना वेबपोर्टलवर माहिती भरताना येत असलेल्या अडचणी व शंकेचे निरसन करता आलेले नाही. **तथापी, ज्या महाविद्यालयांनी अद्याप वेबपोर्टलवर माहिती अंतिम सबमिट केलेली नाही अश्या महाविद्यालयांनी कार्यशाळा होईपर्यंत माहिती सेव व लॉक करावी. नियोजित कार्यशाळेत सहभागी होवून आपल्या अडचणी व शंकेचे निरसन करुन दि.२०/०९/२०२५ पर्यंत वेबपोर्टलवर आपल्या महाविद्यालयाची माहिती अंतिम सबमिट करावी. सदर वेबपोर्टलवर माहिती मूदतीपूर्वी नोंदवून विद्यापीठास सहकार्य करावे ही विनंती.**

कळावे.

आपला विश्वासू,

**कुलसचिव**